
# ३. खेळूया शब्दांशी

A483L6

• वाचा. सांगा. जिंका.




**शिक्षकांसाठी :** खेळ कसा खेळावा हे विद्यार्थ्यांना सांगावे. 'अ' या चौकोनापासून सुरुवात करावी. कॅरमची एक सोंगटी घ्यावी. तिच्या एका बाजूला लाल व दुसऱ्या बाजूला हिरवा रंग द्यावा. खेळताना सोंगटीची लाल रंगाची बाजू पडली, तर एक घर पुढे जावे. सोंगटीची हिरव्या रंगाची बाजू पडली, तर दोन घरे पुढे जावे. प्रत्येक घरात एक अक्षर लिहिले आहे. ज्या घरात तुमची सोंगटी असेल, त्या घरातील अक्षर वाचावे. त्या अक्षराचा शब्द सांगावा. (शब्द सांगण्यासाठी उदाहरणादाखल काही चित्रे दिलेली आहेत.) सोंगटीची लाल रंगाची बाजू पडल्यास दोन शब्द सांगावे. सोंगटीच्या हिरव्या रंगाची बाजू पडल्यास एक शब्द सांगावा. ज्या खेळाडूला शब्द सांगता येणार नाही, त्याची संधी जाईल. जो सर्वांत आधी 'ज्ञ' अक्षरावर पोहचेल तो जिंकेल. हा खेळ गटागटांत घ्यावा. प्रत्येक गटाला एक-एक सोंगटी द्यावी. विद्यार्थ्यांना पुस्तकातील हे पृष्ठ उघडून खेळण्यास सांगावे.
(ॲ, ऑ, अः, ङ, ञ, ण, ळ या अक्षरांपासून सुरू होणारे शब्द मराठी भाषेत नाहीत, म्हणून वरील खेळात ही अक्षरे घेतलेली नाहीत.)